# तनुजाला 'फिनोलेक्स'ची आर्थिक मदत

**पुणे :** तनुजा दत्ताराम मोर्ये ही विद्यार्थिनी एसएससीच्या परीक्षेत स्वामी स्वरूपानंद विद्यामंदिरातून १०० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाली होती. मात्र घरच्या आर्थिक अडचणीमुळे तिला उच्चशिक्षण घेता येणार नव्हते. त्यामुळे फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि त्याचे सीएसआर पार्टनर मुकुल माधव फाऊंडेशन यांनी तनुजाला आर्थिक मदत करुन तिचे उच्च शिक्षणाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मदत केली आहे. तिची कनिष्ठ महाविद्यालयाची फी, निवास-भोजनाचा खर्च आणि शैक्षणिक कारणांसाठी तिला लागणारा अन्य खर्च असे सर्व खर्च उचलण्याचा निर्णय या दोहोंनी घेतला. कंपनीने एक लाख सतरा हजा पाचशे रुपयांची देणगी तनुजा दत्ताराम मोर्ये हिला दिली. यासंदर्भात मुकुल माधव फाउंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू छाबरिया म्हणाल्या, "शिक्षण, आरोग्यसेवा आणि पाणी या आयुष्यातील मूलभूत गरजा आहेत आणि प्रत्येक व्यक्तीला या गरजा पूर्ण करण्याचा समान अधिकार आहे. हा अधिकार त्यांना मिळावा म्हणून लोकांपर्यंत पोहोचण्याचा आणि त्यांना मदत करण्याचा प्रयत्न आम्ही मुकुल माधव फाउंडेशनमधून करतो. शिक्षण हा आमच्या कामाचा महत्त्वपूर्ण स्तंभ झाला आहे. तनुजा लहानपणापासूनच एक हुशार मुलगी होती. तिने होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धेत राज्य स्तरावर रौप्यपदक मिळवले होते. शिक्षण आणि करिअरसाठी ती घेत असलेले कष्ट, तिची वाहून घेण्याची वृत्ती आम्हाला स्पर्शून गेली.